ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
*January - June 2021- Vol. 10 No. 1*

# भारताच्या शैक्षणिक विकासात विनाअनुदानित शैक्षणिक धोरणाचा परिणाम

**संशोधक**
अमोल शशीकांत भोसले

**मार्गदर्शक**
डॉ.बी.एन.कावळे
प्रोफेसर आणि समाजशास्त्र विभागप्रमुख
इंद्रराज कला, वाणिज्य व इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय सिल्लोड, जि. औरंगाबाद.

★★★

**प्रस्थावना** :— भारत स्वतंत्र झाल्यावर आपल्या देशासमोर अनेक समस्या होत्या, त्यापैकी सर्वात महत्वाची समस्या म्हणजे भारतीय समाज व्यवस्थेतील एकूण लोकसंख्यापैकी 86 टक्के भारतीय लोक निरक्षर होते. त्यामुळे भारतीय लोकांचा विकास साधायचा असेल तर त्यांना शिक्षण देणे महत्त्वाचे होते, त्यासाठी भारत सरकारने अनेक आयोग व समित्याची स्थापना आतापर्यंत केल्याची दिसून येते. त्यामध्ये डॉ. राधाकृष्णन आयोग, मुदलीयार समिती, डॉ. कोठारी आयोग, राष्ट्रीय शिक्षण आयोग वरील प्रमाणे आयोग आणि समित्या स्थापन होऊन ही साक्षरतेचे प्रमाण फारसे वाढले नाही. शिक्षणाची गंगा खेडयापाडयापर्यंत पोहचवण्यासाठी 2001 साली महाराष्ट्र शाासनाने कायम विनाअनुदानित शैक्षणिक धोरणाचा अवलंब केला. त्याचा परिणाम म्हणून या शिक्षणसंस्थेत काम करणाऱ्या विनाअनुदानित शिक्षकांना अनेक समस्याचा सामना करावा लागला आहे, व आजही ते सामना करत आहेत. या विनाअनुदानित धोरणात कसे बदल झाले ते पुढील प्रमाणे पाहता येईल.

**Keywords** शिक्षक, विनाअनुदानित शिक्षक, उच्च माध्यमिक शिक्षक, शैक्षणिक धोरण.

**उदीष्टय** :—

1) 2001 साली कायम विनाअनुदानित धोरण पुढे विनाअनुदानित धोरण झाले. त्याचा अभ्यास करणे.
2) विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षकांना सामाजिक आर्थिक समस्या आहेत का याचा अभ्यास करणे.
3) विनाअनुदानित धोरणाचा परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन आराखडा** :— प्रस्तुत शोध निबंध लिहीत असतांना वर्णणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. तसेच तथ्य संकलनासाठी व्दित्तीयक स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये ग्रंथालयातील संदर्भ पुस्तके, शासकीय दस्त ऐवज व वृत्तपत्राचा वापर केला आहे.

**प्रस्तुत संशोधन** :— भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करत असतांना अनेक सामाजिक समस्या आढळतात. त्यामध्ये दारिद्रय, बेरोजगारी, व्यसनाधिणता व वाढती गुन्हेगारी इत्यादी. वरील समस्या या भारतीय लोकांमध्ये असलेला शिक्षणाचा अभाव यामुळे दिसून येतात. परंतु आज भारत देश स्वतंत्र होऊन 73 वर्षे पुर्ण होत असतांना काही नवीन समस्या समोर येत आहेत, त्यातील समस्या ग्रस्थ हे सुशिक्षीत आहेत. प्रस्तुत शोध निबंधात जी समस्या मांडायची आहे ती म्हणजे विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर या देशाचा विकास व्हावा या उददेशाने अनेक योजना आखल्या गेल्या त्यामध्ये शेती, आरोग्य, उदयोगधंदे, रोजगार व या सर्वांमध्ये प्रगती व्हावी यासाठी सर्व भारतीय जनतेला शिक्षण इत्यादी, यामध्ये भारतीय जनतेचा किंवा समाजव्यवस्थेचा विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेत शिक्षण हा घटक खुप महत्त्वाचा आहे. भारत स्वतंत्र झाला तेव्हा एकूण भारतीय समाजव्यवस्थेत फक्त 14 टक्के लोक साक्षर असल्याचे आढळते. यावरुन असे दिसून येते की, 1947 साली 86 टक्के भारतीय समाज हा निरक्षर होता, म्हणून भारतीय समाजव्यवस्थेचा विकास साधायचा असेल तर भारतीय लोकांचे साक्षरतेचे प्रमाण वाढले पाहिजे, यासाठी 1947 पासून आतापर्यंत अनेक शैक्षणिक आयोग व समित्यांची निर्मीती झाली. त्यामध्ये 1948 डॉ. राधाकृश्णन आयोग, 1952 मुदलियार समिती, 1968 कोठारी आयोग, व 1986 राष्ट्रीय शैक्षणिक आयोग, अशा प्रकारच्या आयोगाच्या शिफारशी वरुन शिक्षण व्यवस्थेत आजपर्यंत अनेक बदल घडून आले. वरील प्रमाणे बदल होत असतांना भारतीय समाज व्यवस्थेतील लोकांचे साक्षरतेचे प्रमाण वाढत होते. वरील आयोगांनी शिक्षणाचे तीन टप्प्यात विभाजन केले ते म्हणजे प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च माध्यमिक शिक्षण अशा प्रकारे शिक्षणाचा विस्तार होत गेला. परंतु भारतीय जनतेला आरोग्याच्या सुविधा मिळू लागल्याने मृत्यूदर कमी झाला. त्यामुळे 1971 साली 54.81 कोटी असणारी लोकसंख्या वर्ष 2001 साली 102 कोटी झाली. 1971 ते 2001 या 30 वर्षात लोकसंख्या दुप्पट झाली होती. यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शाळामध्ये वाढ करणे अपरिहार्य होते. तसेच शिक्षणावरील खर्च 1990—1991 दरम्यान G.D.P. च्या 4 टक्के असणारा खर्च पुढे आणखी कमी होत गेला 2010 मध्ये तर ळण्क्च्च्या 3.3 टक्के इतका कमी खर्च शिक्षणावर करण्यात आला. यावरुन असे दिसून येते की, शिक्षणावरील खर्च कमी होत गेला आहे. परंतु अजनू ही 2001 या सालापर्यंत एकूण लोकसंख्येच्या 35 टक्के भारतीय जनता निरक्षर आढळून आली. सन 1976 च्या संवैधानिक संशोध

ानानुसार शिक्षण ही केंद्र व राज्य शासनाची जबाबदारी असल्याने महाराष्ट्र शासनाने वर्ष 2001 पासून कायम विनाअनुदानित धोरणाचा अवलंब करुन शिक्षणाचा प्रसार व्हावा सर्वांना शिक्षण मिळावे या उददेशाने शासनाकडून कुठलिही आर्थिक मदत मिळणार नाही या अटींवर खाजगी शिक्षण संस्थाना शाळा काढण्यास परवानगी दिली. तेव्हा पासून महाराष्ट्रात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण कायम विनाअनुदानित धोरणानुसार शाळा चालविण्यात आल्या. परंतु कायम विनाअनुदानित धोरणातील "कायम" शब्द वगळण्यात यावा अशी मागणी विविध घटकांकडून होऊ लागली, त्यामुळे अशा संस्थांना अनुदान देण्याचा निर्णय दिनांक 16/06/2009 रोजी निर्गमित झाला. तसेच शासनाने परवानगी दिल्यापासून सतत चार वर्शे ते वरील शासन निर्णय येईपर्यंत चालवली गेली अशा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दरवर्शी 20 टक्के अनुदान देण्याचे ठरले त्यानुसार त्या शाळांना पुढील पाच वर्षात 100 टक्के अनुदान देण्यात येईल असे महाराष्ट्र शासनाने जाहिर केले. या काळात दहावी बोर्ड परिक्षेत उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या प्रमाणात उच्च माध्यमिक शाळा कमी प्रमाणात होत्या म्हणून शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी शालेय शिक्षण व किडाविभाग, मंत्रालयाकडे दि. 24/06/2008 रोजी विनंती पत्राद्वारे नविन उच्च माध्यमिक इयत्ता 11 वी च्या वर्गास कायम विनाअनुदान तत्त्वावर परवानगी मागितली. ही विनंती मान्य करुन शासनाने दि. 29 ऑगस्ट 2009 रोजी तसा शासन आदेश निर्गमित केला व अशा उच्चमाध्यमिक शाळांचा, तसेच विनाअनुदानित तुकडयांचा "कायम" शब्द दि. 26 फेब्रुवारी 2014 च्या शासन निर्णयाद्वारे वगळून त्यांना अनुदानावर आणण्याचा निर्णय झाला. वरील कायम विनाअनुदानित धोरणाचा अभ्यास करतांना आज विनाअनुदानित शिक्षकांचे पुढील प्रकार आढळतात. 1) वर्ष 2001 पासूनचे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विनाअनुदानित शिक्षक, 2) 2008–2009 पासूनचे विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक, 3) राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळातील सन 2003–2004 ते 2010–11 या वर्षामध्ीील वाढीव तुकडयातील विनाअनुदानित शिक्षक इत्यादी. वरील तिन्ही प्रकारच्या शिक्षकांनी आता पर्यंत 221 च्या वर आंदोलने करुन आपल्या मागण्या शासनाकडे केल्या आहेत. परंतु त्यांच्या मागण्या आजही पुर्ण झाल्या नाहीत.

15 ऑगस्ट 2019 भारत स्वातंत्र्य दिनी गोंदिया जिल्हयातील आदिवासी ज्यूनिअर कॉलेज (उच्च माध्यमिक शाळा) झाशीनगर, मोरगाव अर्जुनी या शाळेतील विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक केशव गोबडे यांनी आत्महत्या केली. मागिल पंधरा वर्षापासून ते या विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेवर काम करीत होते. शिक्षक हा शिक्षक असतो तो अनुदानित असो किंवा विना अनुदानित, शिक्षकाची आत्महत्या होणे ही आपल्या भारतीय संस्कृतीस न शोभनारी गोश्ट आहे. शिक्षक म्हणजे गुरु, "गुरु रे देवो, गुरु रे विष्णू, गुरु रे साक्षात परब्रम्हः" वैदिक कालखंडात गुरु ला अनन्य साधारण असे महत्व आहे. एवढेच नाही तर गुरु ही मनुश्य आहे. मनुश्य आहे म्हणून गरजा आहेत आणि त्या गरजा समाजव्यवस्थेत योग्य वेळी पुर्ण होणे गरजेच्या आहेत. प्राचिन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेत चार आश्रम आहेत ब्रम्हचर्याश्रम, ग्रहस्थाश्रम, संन्यासाश्रम व वानप्रास्तआश्रम प्रत्येक आश्रमाचा कालखंड 25 वर्षाचा गृहीत धरुन मानवी आयुष्य 100 वर्षाचे गृहीत धरले गेले. तसेच हिंदू धर्मानुसार तीन पुरुशार्थ सांगितले आहेत ते म्हणजे अर्थ, काम व मोक्ष. वरील शिक्षकाची आत्महत्या ही एक सामाजिक घटना आहे. आयुश्यातील 25 वर्षे शिक्षण घेतल्यानंतर शुशिक्षित बेरोजगार होण्यापेक्षा विनाअनुदानित शिक्षक होऊन 15 वर्षे विनावेतन किंवा कमी वेतनावर काम करुन कुटुंबाच्या किमान गरजा पुर्ण करु न शकल्याने ही आत्महत्या झाली. अशा प्रकारच्या कित्येक आत्महत्या पुर्वीही विनाअनुदानित शिक्षकांनी केल्या आहेत. काहींनी अर्थप्राप्ती झाल्यावर गृहस्थाश्रमात प्रवेश करु म्हणून विवाहयोग्य असणारे वय निघुन गेले आहे. काही विनाअनुदानित शिक्षक सेवानिवृत्त झाल्याचे आढळते. शिक्षक म्हणून वेतन, मानधन तर सोडाच : पण शिक्षक म्हणून किमान असलेली प्रतिष्ठाही या विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना मिळत नाही. विनाअनुदानित शैक्षणिक धोरणाने शैक्षणिक विकास घडून आला परंतु शिक्षण प्रक्रियेतील एकूण 22500 शिक्षक विनाअनुदानित तत्त्वावर काम करीत असून राज्यातील

146 घोषीत व 1656 अघोशित शाळेतील विनाअनुदानित शिक्षक या समस्येला तोंड देत आहेत. शिक्षक हा महत्वाचा घटक शासनाच्या विनाअनुदानित धोरणामुळे सामाजिक व आर्थिक समस्येत गुरुफटला आहे. करीता या विनाअनुदानित शिक्षकाचा सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून संशोधन होणे गरजेचे आहे.

### संदर्भ ग्रंथ

1) *आहुजा, रा., साजाजिक समस्यांए, (2016) रावत पब्लिकेशन जयपुर.*

2) *डॉ. दोमडिया, डि.एम., भारतीय षिक्षा का इतिहास, रावत प्रकाशन.*

3) *डॉ. शेटकर, ग.,डॉ. शेवतेकर, शा.,डॉ. जोशी, शो., भारतीय शिक्षणाचा इतिहास मृश्मयी प्रकाशन औरंगाबाद.*

4) *डॉ. किसलय, श., पाण्डेय, अ., भारतीय शिक्षा–नीती (एक नजर) 2006 डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.*

5) *शासन निर्णय दि. 29 ऑगस्ट 2009 महाराष्ट्र राज्य.*

6) *शासन निर्णय दि. 26 फेब्रुवारी 2014, महाराष्ट्र राज्य*

7) *दैनिक लोकशाही दि. 19 ऑगस्ट 2019.*

8) *दैनिक लोकमत दि. 22 ऑगस्ट 2019 पान नं. 08*